

= श्रीराम =

## ॥ दिपावली ॥

दिवाळी किंवा दिपावली हा प्रकाशाचा हिंदू सण आहे. आपल्याकडे हा सण अतिशय उत्साहाने साजरा केला जातो. हा सण इतर भारतीय धर्मांमध्येही साजरा केला जातो.

अंधारावर प्रकाशाचा, वाईटावर चांगल्याचा, आणि अज्ञानावर ज्ञानाच्या विजयाचे" प्रतीक म्हणून या सणाला ओळखतात. हिंदू चंद्रमास, आश्विन आणि कार्तिक या महीन्यात म्हणजे सप्टेंबर आणि नोव्हेंबरच्या मध्यात दिवाळी साजरी केली जाते. हा उत्सव साधारणपणे पाच सहा दिवस म्हणजे गोवत्स द्वादशी पासून भाऊबीजे पर्यंत असतो.

विविध धार्मिक कार्यक्रम, देवता आणि व्यक्तीमत्वांशी दिवाळी जोडलेली आहे. जसे की राक्षस राजा रावणाचा पराभव करून राम आपली पत्नी सीता आणि भाऊ लक्ष्मण यांच्यासह अयोध्येत परतले. समृध्दीची देवी लक्ष्मी आणि बुध्दीची देवता सरस्वती, यांचे अडथळे दूर करणारा देव गणेश यांच्याशी देखील हा सण संबंधीत आहे. या सणाला विष्णू, कृष्ण, दुर्गादेवी, शिव, कुबेर यांची सुध्दा दिवाळीत पुजा केली जाते. दिवाळी हा प्रामुख्याने हिंदू सण असला तरी इतर धर्मांचे लोक देखिल आपापल्यापरीने दिवाळी साजरी करतात.

या दिवाळीच्या सणाला लोक घरामध्ये, देवळामध्ये पणत्या आकाशकंदील लावून प्रकाशीत करतात. घरासमोर रांगोळ्या काढतात. रंगीत संगीत फटाके लावतात. दिवाळीमध्ये सर्व दिवस पहाटे उठून सुगंधीत तेल उटणे लावून आंघोळ करतात. घरोघरी लाडू, करंजी, अनारसे, मिठाई केली जाते. सर्वजण एकत्र येवून हा सण मोठ्या उत्साहाने साजरा करतात. बाहेरगावच्या लोकांना दिवाळी ग्रिटींग, मिठाई व भेटवस्तू पाठवतात. असा हा दिवाळीचा सण सर्व लोक मोठ्या उत्साहाने, आनंदाने साजरा करतात.

सुनिता पटवर्धन.
फोन नं. 9404413853

